# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ११/२०१२-१३ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. शिवाजी मारुती पवार,<br>रा. सिध्देवाडी, ता. तासगाव, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, तासगाव, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.शिवाजी मारुती पवार, रा. सिध्देवाडी, ता. तासगाव, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी तासगाव उप विभाग, ग्रामीण विभाग, सांगली यांचेविरुध्द दि. १२.४.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार ग्राहक यांनी आपली शेत जमीन गट क्र. ५२१ येथे शेतीपंपास ५ अश्वशक्ती नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. ८.२.२०११ रोजी चलन रु. २५८५/- पावती क्र. ४३८६८१९ नुसार भरले व चाचणी अहवाल दि. १४.७.२०११ रोजी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने कुठलाही आदेश केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळावी व कृती मानके विनिमयानुसार विलंबाबद्दल भरपाईच्या तरतुदीनुसार अंमलबजावणी व आदेश व्हावेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.५.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार ग्राहकान चलन भरल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांचे शेतीपंप वीज कनेक्शनसाठी लघुदाब वाहिनीचे ०.५४ कि.मी.चे (९ पोलचे) काम मंजूर असून हे काम पूर्ण करणेसाठी मे. नागार्जुन कन्स्ट्रक्शन कंपनी लि. हैद्राबाद यांना कामाचे आदेश दिले आहेत त्यानुसार काम प्रगतीपथावर आहे. ९ पोल्स उभे केले असून सदर कम ४ ते ५ दिवसात पूर्ण करुन वीज जोडणी देणेचे नियोजन केले आहे असे म्हटले आहे. लेखी अहवालासोबत तक्रारदार यांचे मंचाला अग्रेषित केलेले दि. ७.५.२०१२ चे तक्रार मागे घेत असलेचे संमत्तीपत्र जोडले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ९.५.२०१२ ला सुनावणीस घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. बारशिंग, उप कार्यकारी अभियंता उपस्थित. त्यांनी मंचासमोर अर्जदार ग्राहकास दि. १४.५.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्यात येईल असे सांगितले. तक्रारदाराने दि. ७.५.२०१२ च्या पत्राने तक्रार मागे घेतली असल्याचे प्रतिपादन केले.

## आदेश

१) वितरण कंपनीने लेखी अहवालात व मंचासमोर तक्रारदार ग्राहकास दि. १४.५.२०१२ पर्यंत वीज जोडणी देणार असल्याचे कबूल केल्याने व ग्राहकाने दि. ७.५.२०१२ च्या अर्जात मागणी केल्याप्रमाणे तक्रार निकाली काढणेत येत आहे. भरपाईबद्दल आदेश नाहीत.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

# ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दूरध्वनी क्र. : ०२३१-२६६६००१, २६६६००२
फॅक्स क्र. : ०२३१- २६६६००१
**E-mail : cgrfkolhapur@mahadiscom.in**

महावितरण

कोल्हापूर परिमंडल,
विद्युत भवन", २रा मजला,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३.

---

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com